N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** खडक
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0341 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 02/07/2025 06:51

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 27/06/2025
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 01/07/2025
**Time From (वेळेपासून):** 12:12 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 02/07/2025 **Time (वेळ):** 07:51 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 015
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/07/2025 07:51 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** हवेली तहसिलदार कार्यालयाचे,समोरील मोकळ्या आवारात

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सचिन श्रीपाद कुलकर्णी

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : श्रीपाद कुलकर्णी

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1980

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 371 शनिवार पेठ, कस्तुरी हौसिंग,सोसायटी, पुणे ,खडक,पुणे शहर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | 371 शनिवार पेठ, कस्तुरी हौसिंग,सोसायटी, पुणे ,खडक,पुणे शहर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9730035927

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनिता विनोद रणपिसे | | पती का नाम : विनोद रणपिसे | 1. अमत बारचे मागे ,अशोक नगर, ,जेजुरी जकात नाका सासवड, नारायण,पुर रोड, तापुरदंर, जिपुणे ,सासवड,पुणे ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 2 | जया भंडगे | | | 1. माहित नाही,खडक,पुणे शहर, महाराष्ट्र,भारत |



Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | अनिता छत्रे | | | 1. माहित नाही,खडक,पुणे शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

फिर्याद देताच तात्काळ दाखल

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | भारतीय चलनातील नोटा 500/ रूपये दराच्या 10 नोटा | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

5,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिंनाक 02/07/2025

मी सचिन श्रीपाद कुलकर्णी, वय 45 वर्षे, रा. 371 शनिवार पेठ, कस्तुरी हौसिंग सोसायटी, पुणे मोबाईल नंबर 9730035927

वरील ठिकाणी माझे कुटुंबियासांबत राहत आहे. माझे शिक्षण बीएससी असुन मी अकांउटंन्ट म्हणुन सध्या नाना पेठ येथे काम करतो. माझी पत्नी गहीणी असुन मला दोन मुले आहेत माझा मुलगा इयत्ता 5 वी मध्ये शिकत असुन मुलगी इयत्ता 10 वी मध्ये शिकत आहे. हिंदुस्तान अॅन्टी बायोटीक्स स्कुल (माध्यमिक विभाग) पिंपरी पुणे 18 येथे इयत्ता पाचवी ते दहावी या इयत्तेमध्ये गणित आणि विज्ञान शिकवण्याचे काम करत होतो. परंतु सध्या मी तेथे कोर्ट केस चालू असल्यामुळे कामाला नसून वरील प्रमाणे खाजगी नोकरी करीत आहे. माझे मुळ गाव तासगाव जि. सांगली असे असुन तेथे माझे आई वडील हे जिल्हा परिषद शिक्षक होते.त्यामुळे ते पेन्शनर असुन तेथे वास्तव्य करतात. मी माझे पत्नी मुलांबरोबर पुणे येथे वर नमुद पत्त्यावर राहतो. तसेच मला माझे कुटुंब चालविण्यासाठी करीत असलेले काम व माझ्या आईवडीलांकडुन आर्थिक मदत होत असते.

मी राहत असलेले शनिवार पेठ, कस्तुरी हौसिंग सोसायटी, पुणे येथील फ्लॅट आत्ताच म्हणजे 04/06/2025 रोजी रिसेल वर खरेदी केला आहे. माझी पत्नी सौ. अमता सचिन कुलकर्णी हिचे नावावर खरेदी केला आहे. फ्लॅट खरेदी करण्यासाठी काही रक्कम बचतीतुन दिली आहे. तसेच काही रक्कम वास्तु हौसिंग फायनान्स लिमिटेड या कंपनीतुन लोन घेतले आहे. बँकेने मंजुर केलेले लोन वितरण करण्यासाठी बँकेला खरेदी केलेल्या फ्लॅटच्या दस्ताची म्हणजेच इंडेक्स - 2 ची आवश्यकता होती. त्यासाठी दिनांक 26/06/2025 रोजी दुय्यम निबंधक कार्यालय, हवेली क्र. 1 खडकमाळ आळी पुणे येथे गेलो. तेथे झेरॉक्सच्या दुकानात मिळणारा दस्त मिळण्यासाठीचा छापील अर्ज भरून त्याला 10/- रूपयाचे कोर्ट फी स्टॅम्प लावुन दुय्यम निबंधक कार्यालयात संबधित टेबलला जमा केला. त्यानंतर सबंधित टेबलचे क्लार्क यांनी मला आठ दिवसांनी आपल्याला आपल्या दस्ताची (खरेदी खत सत्यप्रत) प्रत मिळेल असे सांगितले.परंतु मला बँकेतील मंजुर झालेल्या लोन रकमेचा डीडी(डिमांड ड्राफ्ट) तातडीने पाहिजे होता म्हणून तहसिल कार्यालयाच्या बाहेर मोकळ्या जागेत बसणा-या खाजगी महिला रायटर यांचेशी संपर्क साधला व माझी अडचण सांगुण मला लवकरात लवकर दस्त प्रत कशी मिळेल याबाबत विचारण करता खाजगी रायटर महिला श्रीमती वंदना रणपिसे यांनी माझेकडुन 6000/-रु दिले तर तुमचे काम लवकर करुन देते असे म्हणाल्या.रु 6000/- मधील 1000/- माझे व 5000/- मला आतमध्ये कार्यालयात कॉपी मिळवण्यासाठी द्यावे लागतील



Scanned with CamScanner

अशाही त्या म्हणाल्या.
श्रीमती अनिता रणपिसे या मागत असलेले पैसे कार्यालयामध्ये काम करणा-या लोकसेवक व त्यांच्यासाठी मागत
असल्याचे त्यांनी मला सांगितले.श्रीमती रणपिसे मागत असलेले पैसे लाच रक्कम असल्याचे मला माहित होते.मला
श्रीमती रणपिसे व त्यांनी सांगितलेले कार्यालयातील इतर लोक यांना लाच देण्याची इच्छा नव्हती. माझे व श्रीमती
रणपिसे यांचे पुर्ववैमनस्य नाही किंवा आमचेत कोणतेही प्रकारचे आर्थिक व्यवहार नाहीत. दि.26/06/2025 रोजी
सायंकाळी 18/00 चे दरम्याण लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय,पुणे येथे पोलीस उपअधिक्षंक श्री. गावडे यांना
श्रीमती रणपिसे यांचेविरुद्ध लाचेची लेखी तक्रार दिली होती. त्यांनी त्यांचे दालनात सहा. पोलीस आयुक्त श्रीमती मोरे
यांना बोलावुन सदर तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करणेबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार कृषी आयुक्तालय
पुणे कार्यालयातुन दोन पंच उपलब्ध करून देण्यात आले त्यांची नावे 1) श्रीमती प्रियांका श्रीराम कचरे, वय- 31
वर्षे, व्यवसाय - शासकीय नोकरी, पद - कनिष्ठ लिपीक, संचालक फलोउत्पादन, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे रा. फ्लॅट नं.604, कॅप्रिशिओ सोसायटी, दत्तमंदिर रोड, वाकड जि. पुणे मो.क्र. 9834819390, 2) श्री.
आशिष श्रीनारायण अगरवाल, वय - 35 वर्षे, व्यवसाय- शासकीय नोकरी, पद - कृषि सहसंचालक (आस्थापना),
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे रा. घर क्र.जी-25, कुंदन कुशल नगर, किर्लोस्कर ऑईल कंपनीच्या
पाठीमागे, बोपोडी, पुणे मो.क्र.8788241758 असे उपलब्ध झाल्यानंतर मी माझी लेखी तक्रार पंचासमक्ष वाचून
दाखविली सदरची तक्रार माझे हकीकते प्रमाणे असल्याची खात्री करून माझे लेखी तक्रारीवर सपोआ भारती मोरे
यांनी व पंच साक्षीदार यांनी वाचुन त्यावर सहया केल्या आहेत. परंतु दि.26/06/2025 रोजी दिलेल्या तक्रारीनंतर
निबंधक कार्यालय बंद असल्याने पडताळणी कारवाई 27/06/2025 रोजी करण्याचे ठरविण्यात आले.
दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने पडताळणी करण्याकरिता दि.27/06/2025 रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त
श्रीमती भारती मोरे यांनी दोन शासकिय पंच, पंच क्र 1 श्रीमती प्रियांका कचरे, सापळा पथक उपस्थित असताना
सुचना दिल्या. माझे व पंच क्र 1 श्रीमती प्रियांका कचरे असे आमचे पडताळणी कारवाईचे अनुशंगाने निवेदन
शासकिय व्हाईस रेकॉर्डवर ध्वनिमुद्रित केले. मी माझ्या एम एच 10 सीएस 5362 होन्डा डिओ या दुचाकी मोटार
सायकलने लाप्रवि कार्यालयातुन सकाळी 11/36 वा. रवाना झालो. सारसबाग खाऊ गल्ली येथे पोहचलो.काही
वेळातच शासकिय वाहन क्रमांक एमएच 12 एनयु 5882 सुमो या शासकीय वाहनाने सापळा पथक स्वारगेट येथे
असणा-या सारसबागेतील सारसबाग खाऊ गल्ली येथे सकाळी 11/50 वा पोहचले.त्यानंतर मला शासकीय व्हाईस
रेकॉर्डर चालु करुन पंच क्र 1 यांचेसह 12/12 वा.माझे दुचाकी मोटार सायकलने रवाना झालो. खाजगी रायटर
महिला श्रीमती अनिता रणपिसे यांना भेटण्यासाठी थेट तहलिदार कार्यालयाचे आवारात डाव्या बाजुला लावलेल्या
त्यांच्या टेबल जवळ गेलो.त्यांनी मला पाहिले,त्यावेळेस मी त्यांना माझ्या बरोबर आलेल्या पंच क्र 1 श्रीमती प्रियांका
कचरे यांची ओळख माझी बहिण पण आलिये अशी करुन दिली. त्यावेळेस रणपिसे मला म्हणाल्या तुम्ही कुलकर्णी
ना? मी हो म्हणालो व त्यांना तुम्ही मला फोन केला होता ना,असे बोललो,त्यावर रणपिसे यांनी मला विचारले की,
मला पाठवलेले पैसे आले नाहीत,तसेच ह्याची पावती दिली ना तुम्ही मला,दस्त क्रमांक एक्क्याण्णव चाळीसची,त्यावर
मी म्हणालो बरोबर आहे,सतरा जुलै सत्त्याए◌ैशीची,त्यावर रणपिसे यांनी मला मी दिलेली छायांकित प्रत दाखवुन मग
ही पावती तुमचीच ए ना,असे विचारता मी त्यांना हो मी तुम्हाला दिली ना काल असे म्हणालो,त्यावर रणपिसे
म्हणाल्या,हा माझेकडे एक आहे की ,पैसे पाठवावा मग का,नायतर कॅश आणली असल तर त्यावर मी पैसे कॅशच
देतो असे म्हणालो,त्यावर रणपिसे मला म्हणाल्या,नाय मग आता अस करा सहा झालेत ना,तिन द्या मला,त्यावर मी
त्यांना मी सगळेच पैसे देतो,पहिला मला दस्त द्या,त्यावर रणपिसे या,नाय ना लगेच कसे मिळेल,त्यावर मी त्यांना
ऑफिसमध्ये विचारुन बघा, असे म्हणता,रणपिसे म्हणाल्या की, नाय ना इथुन इथे नाहीच उ तो बाहेरून आणायचा
म्हणुन तर वेळ एक दिवस तर जाणारच ए,असे बोलल्या,तसेच पैसे देवून जा ना मग तुम्ही झालं की,त्यावर मी त्यांना
हव तर जास्त पैसे देतो असे म्हणता,रणपिसे या तुम्ही, हजार रुपये जरी दिले ना तरी लवकर मिळणार नाही, उद्या
बँक चालु ये उद्या,मी त्यांना म्हणालो,पैशाची काळजी करु नका,मला दस्त तात्काळ द्या, त्यावर रणपिसे मला
म्हणाल्या, तुम्ही थोडे फार तरी अ◌ॅडव्हान्स द्या ना मला, मला सगळे नका देवु आता तुम्ही सगळे देवू नका
अ◌ॅडव्हान्स द्या अन मी तुमच्या हातात दिल्यानंतर बाकीचे द्या अ◌ॅडव्हान्स द्या, आओ तुम्ही मला अ◌ॅडव्हान्स
देवुन थांबा अ◌ॅडव्हान्स दिल्याशिवाय पुढं कस करणा तो माणूस असे बोलत असताना तेथेच असणारी इतर महिला
क्र-1 मला बोलल्या की, आओ अ◌ॅडव्हान्स दिल्याशिवाय ते पुढ कस, तुमचा काय भरोसा, रूपया सोडत नाही,
अन तुमच काम झाल तुमी काहीच नाय दिल तर, अन तुमी नाहीच दिल तर,त्यावर मी त्यांना म्हणालो मग दोन्ही
कडनं य.. तेच म्हणतो ना तुमचं पण आमचं पण ए ना,त्यावर त्या इतर महिला होत्या त्या मला म्हणाल्या की,
अ◌ॅडव्हान्स देतात,त्यावर रणपिसे म्हणाल्या की, आयुष्यात मी काय तुमचे सहा हजार घ्यायचे नाय तर दोन हजार
रूपये घ्यायचे मी पळून गेल्यावर मला तेवढं आयुष्यभर पुरणारेत का,त्यावर मी त्यांना म्हणालो की, मी काय म्हणतो



Scanned with CamScanner

दस्त द्या एका हातात दस्त एका हातात पैसे त्यावर रणपिसे म्हणाल्या की, तुम्ही मला अॅडव्हान्स द्या काहीतरी, म्हणजे मग मला त्यांना म्हणता येत अॅडव्हान्स दिलय त्यांनी घेवु हे,त्यानंतर रणपिसे मला म्हणाल्या काय म्हणल्यात बघु,सहिला कोणी नाही सोमवारी मिळेल,साहेबांच्या सही शिवाय कशी मिळणार हो सर्टिफाय कॉपी,त्यावर तिथेच असणा-या इतर महिला-2 या मला म्हणाल्या की, तुमची कॉपी फोटांझिंकला सापडलीय काढून ठेवली, ऋषि सर नाहीयेत, सर्टिफाईड कॉपी देण्यास सांगितले, पी पी पावती करून ती करावी लागती आज ऋ षि सर नाहीयेत कोर्टात ते, तर आज बंद ठेवलंय सोमवारी तुम्हांला मिळुन जाईल मी चलन बिलन आत सगळं बनवून ठेवनं यांचा अर्ज घे सही घे पान किती ए बघून चलन बिलन बनवून ठेवून सोमवारी आपण 12.00 वाजेपर्यंत द्यायची व्यवस्था करू, पण इथं ऋ षि सर नाहीयेत तुम्ही आता बघून आले की कोण नाय आत मधी असे म्हणाल्या,त्यावर मी त्यांना म्हणालो की, मी सगळंच आणलेत पैसे, सगळेच देवून टाकतो कशाला अॅडव्हान्स देवु,त्यावर इतर महिला 2 हा म्हणाल्या की, ते बी सांगते देवुन टाका तिला तीन हजार रूपये काय विषय नाय पाचशे रूपये देवू दे,त्यावर रणपिसे म्हणाल्या की, नाय नाय पाचशे रूपये कशाला तीन हजार रूपये देवू दे त्यांना म्हणजे आतमध्ये पैसे झेरॉक्स दिली तर त्यांना पैसे नको द्यायला,त्यावर मी म्हणालो की, ऐका ऐका एकुण किती द्यायचे,त्यावर रणपिसे म्हणाल्या की, सहा सांगितले ना मी तुम्हाला हा तुम्ही मला तीन देवून जा, तीन देवुन जा सोमवारी तीन द्या त्यानंतर लगेच इतर महिला 2 म्हणाल्या की, ते बी सांगते देवुन टाका तिला तीन हजार रूपये काय विषय नाय त्यावर रणपिसे म्हणाल्या की, तुम्हाला लक्षात आलं पाहिजे आम्ही मामलेदार कचेरीत काम करतो त्यावर मी म्हणालो की, एटीएम कुठयं त्यावर रणपिसे म्हणाल्या की, आता ते एटीएम का बंद केले हे मला तरी काय माहिती ओ आता तुम्ही तर म्हटले की सहा हजार कॅश आणलेत त्यातले तीन द्याना परंतु खाजगी महिला रायटर यांनी लाच मागताना लोकसेवक ऋषी सर यांचे नाव घेतल्याने त्या बाबत पडताळणी करणे बाकी होते व ते सोमवारी येणार होते म्हणुन मी एटीएम मधुन पैसे घेवुन येतो असे सांगुन बाहेर आलो.तसेच दि.28/06/2025 व दि.29/06/2025 रोजी कार्यालयाला सुट्टी असल्यामुळे पुढील कार्यवाही दि.01/07/2025 रोजी करण्याचे ठरविले.

दि.30/06/2025 रोजी माझे व पंच क्र 1 श्रीमती प्रियांका कचरे असे आमचे पडताळणी कारवाईचे अनुशंगाने निवेदन शासकिय व्हाईस रेकॉर्डवर मध्ये 11/36 वा.ध्वनिमुद्रित केले. त्यानंतर लाप्रवि कार्यालयातुन निघुन खाऊ गल्ली सारसबाग येथे 12/15 वा.पोहचलो. पडताळणी कारवाई साठी पंच क्र 1 यांचेसह 12/25 वा.रवाना झालो.मी नोंदणी कार्यालयात आत मध्ये जावुन ऋषि सर कोण आहेत? याबाबत विचारणा केली असता,बाहेरच्या खोलीत बसलेबाबत मला कळाले.त्यांना मी माझ्या मोबाईल मधील दस्त मागणी केलेला अर्ज दाखवला असता, त्यांनी मला उद्या दुपारी तिन वाजता या असे सांगितले.तसेच मला त्यांनी माझ्या दस्तचा नंबर विचारला असता 9140 असलेबाबत मी त्यांना सांगितले.तसेच खाजगी महिला रणपिसे यांनी माझेकडे ऋषी सरांना देण्यासाठी पैसे लागतात असे सांगितले होते.म्हणुन मी त्यांना विचारता नाय नाय नाय,मग आता ऐका रणपिसे बाई ने पैसे सांगितलेत सहा हजार त्याच काय असे मी ऋषी सरांशी बोललो असता ते हसुन मला म्हणाले की मला सहा हजार? असे म्हणुन आयच्या गावात असे म्हणले,तसेच त्यांनी खाजगी महिलेला हा ऋषी सरांनी बोलवलय म्हणुन सांगा,लगीच बोलवा, असा निरोप दिला.तसेच नाय अर्ज द्या,की सहा हजार रुपये मागितले होते म्हणुन,अर्ज द्या फक्त तुम्ही पण एक त्यावर मी ऋषी यांना म्हणालो की ऑप्शन सांगा मला,ऑप्शन सांगा दुसरा ऑप्शन सांगा मला त्यावर ते मला म्हणाले की, नाय नाय,ते दुसरा ऑप्शन ये याचेमध्ये हे काढतो मी,आण मे फाटु द्या अण मग पोलीस वाले विचारुद्या की,? हे फाडला का तुम्ही ऋषी सरांनी खाजगी महिला रणपिसे यांनी बोलावल्यामुळे त्या माझ्यावर चिडल्या व तुम्ही नका, सगळ काम कॉम्प्ल्ीकेटेड करुन ठेवलय,मी सगळ मिळुन सहा हजार त्यांना सांगितल,मी त्या दिवशी नेमक घरी जा,आणि ते फॉर्म काढुन देतो,मी यांना शुक्रवारी ह्यांना काय म्हणल ऋषी आज नायित त्या मुळे आज काय कॉपी नायिये,सोमवारी देईल,आणि ते तीन तीन वेळा सांगतातेत तुम्हाला इथ येवुन सांगतातेय,त्यावर ऋषी खाजगी महिलेस बोलले की, नाय नाय त्यांना तुम्ही सांगितल,आम्ही मागितले.ऋषी सरांना भेटुन त्यांचेशी झालेल्या संभाषणावरुन ऋषी सरांनी दस्त देण्यासाठी लाचेची मागणी केली नसल्याचे निष्पन्न झाले.परंतु दि.27/06/2025 रोजीच्या पडताळणी कारवाईत खाजगी महिला रायटर यांनी 6000/-लाच मागितलेचे निष्पन्न झाले होते.त्या अनुशंगाने त्याचेवर सापळा कारवाई करण्यासाठी मी केलेल्या विंनती वरुन सापळा कारवाईचे नियोजन केले. श्रीमती मोरे मॅडम यांनी मला लाच रक्कम हजर करण्याकरिता दिलेल्या सुचनेवरुन मी माझ्या बचतीतले फक्त 6000/- रु भारतीय चलनी नोटा लाच रक्कम म्हणुन दिल्या.मी हजर केलेल्या नोंटाचे नंबर कागदावर लिहुन घेण्यात आले. त्यानंतर मला सापळ्या संबधी मोरे मॅडम यांनी सुचना दिल्या.नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावुन त्या माझ्या नेसणीस असलेल्या शर्टच्या खिशात ठेवल्या.सापळा कारवाई करण्यासाठी पंच क्र 1 व मी 16/07 वा.रवाना झालो. परंतु खाजगी महिला रणपिसे त्यांचे रहाते घरी सासवड येथे निघुन गेल्याने मी पंच क्र 1 यांचेसह शासकीय वाहनाजवळ परत 16/24 ला परत आलो.सापळा अधिकारी मोरे मॅडम यांनी मला पुढे काय करायचे असे विचारता,



Scanned with CamScanner

मी आज कारवाई स्थगीत करु व उद्या कारवाई करु असे सांगितले.

दि.01/07/2025 रोजी खाजगी महिला श्रीमती रणपिसे यांनी मागितलेल्या लाचेनुसार सापळा कारवाईसाठी माझे व पंच क्र 1 यांचे सापळा निवेदन 11/16 वा. नोंदविण्यात आले.तसेच यापुर्वी दिलेल्या सुचनांची उजळणी केली. सापळा पथकातील महिला पोलीस शिपाई पवार यांनी नोटांना पावडर लावली त्यानंतर नोटा माझे नेसणीस असलेल्या फिक्कट अबोली शर्टच्या खिशात ठेवल्या.त्यानंतर सापळा अधिकारी श्रीमती मोरे मॅडम यांनी मला सापळा पथकास सापळ्याच्या अनुशंगाने सुचना देवुन खाजगी महिला रायटर यांनी लाच स्विकारल्यास डोक्यावर हात फिरवुन सापळा पथकास पुर्वनियोजित इशारा करण्यास सांगितला. त्यानुसार 11/20 वा.व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या फिक्कट आबोली रंगाच्या आतील बाजुस बनियनला आतुन लावला.मी खाजगी महिला रणपिसे यांची तहसिल कार्यालयात लाचेची रक्कम देण्यासाठी गेलो.

खाजगी महिला रणपिसे माझ्यावर प्रथम चिडल्या.त्यांनी माझे काम करण्यास नकार दिला तुम्ही मला पन्नास हजार दिले तरी मी तुमचे काम करणार नाही असे म्हणाल्या.त्यांचेशी माझे बोलणे झाले परंतु त्यांनी मला तेथुन जाण्यास सांगितले.मी तेथुन निघुन बाहेर येवुन शासकीय वाहन थांबलेल्या ठिकाणी पोहचलो.पोलीस शिपाई तावरे यांनी माझा व्हाईस रेकॉर्डर 12/10 वा.बंद केला.त्यानंतर सापळा अधिकारी यांनी मला परत का आले? असे विचारता मी त्यांना खाजगी महिला यांनी माझे काम करणार नसल्याचे सांगुन मला जाण्यास सांगितले.मी त्यांना काम करण्याबाबत विंनती केली असा त्यांनी मला ऋषी संराकडे जावुन काम करण्यास सांगितले.त्यानंतर माझ्या म्हणण्याप्रमाणे सापळा पथकाने खाजगी महिला रणपिसे यांचा फोन येतो अगर कसे? यांची वाट पाहत असताना माझ्या मोबाईलवर खाजगी महिला रणपिसे यांनी मला कॉल केल्याचे मिस कॉल अलर्ट मॅसेज दिसला.म्हणुन मी सापळा अधिकारी मोरे यांना सदर बाबत माहिती दिली व पुन्हा सापळा कारवाईसाठी पाठविण्याची विंनती केली. त्यानुसार मला पुन्हा एकदा व्हाईस रेकॉर्डर 12/50 वां.चालु करुन पंच क्र 1 यांचेसह सापळा कारवाईसाठी सुचना देवुन पायी पाठवण्यात आले.

त्यानंतर मी खाजगी महिला रणपिसे यांचे समोर जावुन उभा राहिलो असता,त्यांनी बाजुस असणा-या इतर महिला 2 यांचेशी चर्चा करुन त्यांनी पैसे घेवु का? त्यावर इतर महिला 2 यांनी घे मी विचारलय त्यांना परत किरकिर नको करायला त्यांना असे म्हणाल्या. त्यावर मी रणपिसे यांना विचारले देवू का ? त्यावेळेस खाजगी महिला रणपिसे यांनी पुन्हा इतर महिला 2 यांना घेवु का पैसे? असे विचारले त्यावर इतर महिला 2 हा घे ना असे म्हणाल्या. त्यावेळेस इतर महिलेने 5000/-रु घे असे सांगितले.त्यावेळेस मी उजव्या हाताने दिलेले लाचेची रक्कम खाजगी महिला रणपिसे यांनी उजव्या हाताने स्विकारली.लाचेची रक्कम रणपिसे यांनी दोन्ही हातांनी मोजुन त्यातील 1000/- रु मला परत दिले व उरलेले 5000/- रु.घडी करुन डाव्या हातात ठेवल्या.

त्यानंतर लागलीच मी अजुबाजुला उभ्या असलेल्या सापळा पथकास डोक्यावरुन हात फिरवुन पुर्वनियोजित इशारा केला.त्यावेळी सापळा पथकातील पोलीस शिपाई तावरे यांनी येवुन 13.11 वा.व्हाईस रेकॉर्डर बंद केला. तसेच मला लाचेच्या रक्कमेबाबत माहिती विचारली,लाच रक्कम स्विकारलेल्या महिलेबाबत विचारणा केली.त्यावेळेस मी त्यांना खाजगी महिला रणपिसे यांनी लाच रक्कम स्विकारल्याचे दाखवुन दिले.त्यांनतर सापळा पथकाने खाजगी महिला रणपिसे यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे त्यांच्या हातातुन लाचेची रक्कम पंचासमक्ष हस्तगत केली. लाचेचीच रक्कम असलेबाबत खात्री केली.खाजगी महिला रणपिसे यांना जवळच असलेल्या उमाजी नाईक स्मारक इमारतीत पाठिमागच्या साईडला अंधार असलेल्या ठिकाणी नेले असता व त्यांच्या हाताची तपासणी अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात पंचासमोर केली असता,त्यांच्या दोन्ही हाताच्या बोंटाना व तळहाताला अॅन्थ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली.

खाजगी महिला यांना त्यांचे नाव व पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव श्रीमती अनिता विनोद रणपिसे रा. अमृत बारचे मागे , अशोक नगर, जेजुरी जकात नाका सासवड, नारायणपुर रोड, ता.पुरदंर, जि.पुणे असे सांगितले.तसेच त्यांच्या डाव्या बाजुस असलेल्या इतर महिला 1 यांचे नाव विचारता त्यांचे नाव श्रीमती जया भंडगे व इतर महिला क्र 2 हिचे नाव विचारता नाव श्रीमती अनिता छत्रे असे सांगितले.

दि.27/06/2025 व दि.30/06/2025 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्याण खाजगी महिला अनिता रणपिसे यांनी माझे दस्त क्र 9140 ची सर्टीफाईड प्रत दुय्यम निबंधक कार्यालय,हवेली क्र 1 येथुन मिळवुन देण्यासाठी रुपये 6000/- लाच मागितल्याचे निष्पन्न झाले.तसेच खाजगी महिला हा लाच मागत असताना इतर महिला 1 नामे जया भंडगे यांनी आओ अॅडव्हान्स दिल्याशिवाय ते पुढ कस, तुमचा काय भरोसा, रूपया सोडत नाही, अन तुमच काम झाल तुमी काहीच नाय दिल तर, अन तुमी नाहीच दिल तर असे म्हणाल्या व इतर महिला 2 नामे अनिता छत्रे यांनी पडताळणी कारवाई दरम्याण पाचशे रूपये देवू दे ,तसेच ते बी सांगते देवुन टाका तिला तीन हजार रूपये काय विषय नाय म्हणाल्या व सापळा कारवाई दरम्याण देखिल घे मी विचारलय त्यांना परत किरकिर



Scanned with CamScanner

नको करायला व घे ना म्हणुन त्यांनी सदर लाच मागणीस व स्विकारण्यास अपप्रेरणा दिली.

दि.26/06/2025 रोजी खाजगी महिला रायटर श्रीमती अनिता रणपिसे यांनी माझे माझे दस्त क्र 9140 ची सर्टीफाईड प्रत दुय्यम निबंधक कार्यालय,हवेली क्र 1 यांचेकडुन मिळवुन देण्यासाठी माझ्याकडुन स्वतासाठी 1000/-रु व दुय्यम निबंधक कार्यालयातील लोकांसाठी 5000/- रु असे 6000/-रुपयांच्या लाचेची मागणी केली.
दि.01/07/2025 रोजी 6000/- रु लाचेची रक्कम स्विकारुन त्यातुन 1000/- रु मला पुन्हा परत देवुन 5000/-रुपयाची लाच तहसिल कार्यालयात बाहेरच्या बाजुस असणा-या मोकळ्या आवारात स्विकारली.तसेच सदर बाबत पडताळणी,सापळापुर्व व सापळा कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.
तरी मी दि.26/06/2025 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो पुणे येथे दिलेल्या लेखी तक्रारीचे अनुषंगाने दि. 27/06/2025 रोजीचे 12.12 वा. पासून ते दि.30/06/2025 व दि.01/07/2025 रोजीचे 13.30 वा. दरम्यान करेणत आलेल्या पडताळणी, सापळापुर्व व सापळा कारवाई दरम्यान यातील आरोपी महिला श्रीमती अनिता विनोद रणपिसे वय 54 वर्षे व्यवसाय – खाजगी लेखनिक रा.जेजुरी जकात नाका, अमृत हॉटेल मागे, अशोकनगर, सासवड ता. पुरंदर जि. पुणे यांनी मला हव्या असलेल्या दस्त क्र.9140 ची सर्टीफाईड कॉपी दुय्यम निबंधक हवेली क्र.1 येथील कार्यालयामधून मिळवून देणेकरीता त्यांचे स्वत: व दुय्यम निबंधक हवेली क्र.1 कार्यालयातील लोकसेवकाकरीता हवेली तहसिलदार कार्यालयाचे समोरील मोकळ्या जागेत रु.6000/- लाचेची मागणी केली व ती माझेकडून स्वीकारून त्यापैकी रु.1000/- मला परत दिले व सदर खाजगी महिला रणपिसे यांचे लाच मागणीस तेथे काम करीत असलेल्या खाजगी लेखनिक इतर महिला क्र.1 श्रीमती जया भंडगे व इतर महिला क्र.2 श्रीमती अनिता छत्रे यांनी प्रोत्साहन दिले म्हणून माझी खाजगी महिला श्रीमती अनिता रणपिसे, श्रीमती जया भंडगे व श्रीमती अनिता छत्रे यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.
माझी वर नमूद संगणाकावर मराठीत टंकलिखीत केलेली फिर्याद मी सांगितलेप्रमाणे बरोबर व खरी आहे ती मी वाचुन पाहिली आहे.
समक्ष

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

shashikant bharat chavan(I (Inspector)) / DGPSBCM7202 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**No.**(क्र.):

**Rank** (पद):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): shashikant bharat cl
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPSBCM7202

ठाणे अंमलदार
खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर



Scanned with CamScanner